राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : २३५/२०२०**

तक्रारकर्ता, श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा,
रा.प्रभात नगर, भोसा रोड, राजु किराणा जवळ, यवतमाळ

विरुध्द

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विभागीय पुरवठा अधिकारी,**
**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती, ता.जि.अमरावती**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (पुरवठा),
विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती, ता.जि.अमरावती

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २२.०८.२०२४**

तक्रारकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २३.०१.२०१९ | -- | २७.१०.२०२० |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.३२६०/२०१५ दि.२३.०१.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २२.०८.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.पंकज सदातपुरे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.शैलेष देशमुख हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र. ३२६०/२०१५) मध्ये दिनांक २३.०१.२०१९ रोजी सुनावणी घेवून "१. अपिलार्थीने दाखल केलेली तक्रार आगामी ३ महिन्यात विभागीय आयुक्त कार्यालयाने निकाली काढून अपिलार्थीस माहितीचे निशुल्क प्रदान करावे. २. माहितीचा अर्ज तक्रारीवर आधारित असून व ३ महिन्यात तक्रार निकाली काढणे बंधनकारक असतांना ५ वर्षाचा कालावधी पार पडूनही ती प्रलंबित आहे. याची विभागीय आयुक्त अमरावती यांनी विलंबास प्रतिबंध अधिनियमाचे कलम १० (१) नूसार संबंधितांवर जबाबदारी निश्चीत करुन कलम १० (२) नुसार कार्यवाही करावी व अनुपालन ३ महिन्यात आयोगास सादर करावे. ३. अपिलार्थीस योग्य प्रतिसाद दिला नाही, म्हणून केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे

कलम १९ (८) (ख) नुसार विभागीय आयुक्त, अमरावती यांनी अपिलार्थीस नुकसान भरपाईपोटी धनादेशाद्वारे रुपये २०००/- ची नुकसान भरपाई द्यावी." असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, द्वितीय अपील क्र. ३२६०/२०१५ या प्रकरणात दि.२३.०१.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवित मुळ तक्रारकर्ता श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांनी दि.२७.१०.२०२० रोजी कलम १८ (१) अन्वये वरील तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. वरील तक्रार अर्ज प्रलंबित असतांनाचे कालावधीत दि.२३.०१.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशातील परिच्छेद क्र.३ यात खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.

"३. अपिलार्थीस योग्य प्रतिसाद दिला नाही, म्हणून केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (८) (ख) नुसार विभागीय आयुक्त, अमरावती यांनी अपिलार्थीस नुकसान भरपाईपोटी धनादेशाद्वारे रुपये २०००/- ची नुकसान भरपाई द्यावी."

असे करित असतांना उपरोक्त आदेशात, मुळ तक्रारदार श्री. शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांनी दि.२२.०४.२०१४ रोजीचा तक्रार अर्ज जो विभागीय आयुक्त कार्यालयात सादर केला होता त्यावर विहीत मुदतीत निकाली न काढल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना तक्रारकर्त्यास कुठलीच माहिती प्रदान करता आली नसल्याचा निष्कर्ष नोंदवित तसेच मुख्य सचिव यांचे दि.१८.०१.२०१३ रोजीचे परिपत्रकाचा हवाला देत उपरोक्त आदेश पारित करण्यात आले असल्याचे आढळून येते. याप्रकरणी प्राधिकरणाचे वतीने उपायुक्त पुरवठा यांनी दि.५.०७.२०२४ रोजी लेखी निवेदन सादर केले असून, यात तत्कालीन विभागीय आयुक्त यांचा सदर प्रकरणाशी व प्रत्यक्ष कुठलाही संबंध नाही तसेच सदर प्रकरणात पक्षकार सूध्दा नसून सदर नूकसान भरपाई देण्याची बाब क्षमापीत करण्यात यावी, अशी विनंती केली असून, तक्रारकर्ता यांना अपेक्षीत असणारी माहिती दि.२८.०१.२०१९ रोजी निशुल्क प्रदान केली असल्याबाबत कार्यालयाच्या नस्तीतील उपलब्ध कागदपत्रांच्या नोंदीप्रमाणे स्पष्ट होत असल्याचेही यात नमूद केलेले आहे. तसेच अर्जदारास पाहिजे असलेल्या माहिती करिता दि.०४.०६.२०१५ रोजी केलेल्या अर्जानूसार दि.१७.०६.२०१५ अन्वये माहिती देखील पुरविण्यात आली असल्याची बाब नमूद केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी पारित केलेल्या आदेशाच्या परिच्छेद क्र.३ संदर्भात अपिलार्थी श्री. शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांनी उपरोक्त प्रकरण सुनावणी दरम्यान तत्कालीन मा.आयुक्त महोदय यांनी प्राधिकरणास नुकसान भरपाई देण्याबाबत निर्देश दिले असून, त्यात टंकलेखनाच्या चुकीमुळे विभागीय आयुक्त असा उल्लेख झाला असल्याबाबत स्वत:च प्रांजळपणे कबुल केलेले आहे. ही बाब लक्षात घेता, तसेच मुळ अपिलार्थी/तक्रारदार श्री. शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांनीच नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त आदेशातील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केलेले विभागीय आयुक्त, अमरावती यांचेबाबतचा उल्लेख हा अशुध्द टंकलेखनामुळे आलेला आढळून येतो. ही बाब लक्षात घेता, तक्रारकर्ता श्री. शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांचे मान्यतेनूसार प्रस्तुत प्रकरणी परिच्छेद क्र.३ मध्ये विभागीय आयुक्त, अमरावती यांचा झालेला उल्लेख हा श्रुतलेखन /टंकलेखनातील चुकीमुळे झाला असल्याने उपरोक्त बाबीबाबत शुध्दीपत्रक निर्गमित करणे योग्य ठरेल. प्राधिकरणाने दाखल केलेले निवेदन



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

तसेच मुळ अपिलार्थी /तक्रारदार यांनी प्रांजळपणे केलेले कथन लक्षात घेता, उपरोक्त आदेशातील परिच्छेद क्र. ३ हे मागे घेण्यात येत आहे. तसेच आदेशातील मुद्या क्र.१ व २ व एकंदरीतच स्वस्त धान्य दुकानाबाबत तक्रारकर्ता यांनी केलेल्या मुळ तक्रार अर्जावर प्राधिकरणाने दिलेला प्रतिसाद व इतर बाबींवर सविस्तर सुनावणी घेण्यात येईल.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

(राहुल भा. पांडे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २२.०८.२०२४**

जावक क्रमांक ६०३८ दिनांक 03 SEP 2024

...षित केले
03 SEP 2024